# NCC Annual Report-2022-23

## Department of NCC (Army & Nevy Unit)

- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये महाविद्यालयाच्या आर्मी एनसीसी विभागामध्ये ३८ मुली तर १६ मुले तसेच नेव्हल एन.सी.सी. विभागामध्ये १७ मुली आणि ३३ मुले असे एकंदरीत ५५ मुली व ४९ मुले मिळून १०४ छात्र प्रशिक्षण घेत आहेत. आर्मी विभाग ऑफिसर सानिका भालेकर तर नेवल विभाग सब लेफ्टनंट उदय भाटे सांभाळतात.
- महाविद्यालयाच्या एन.सी.सी. विभागातर्फे शैक्षणिक वर्षे २०२२-२३ मध्ये रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, विविध जनजागृती अभियान, रॅली, नदीवरील बंधारा बांधणे, वृक्षारोपण करणे यासारखे विविध समाजाभिमुख उपक्रम तसेच कारगिल विजय दिवस, स्वतंत्रता दिवस तसेच प्रजासत्ताक दिन यासारखे राष्ट्रीय कार्यक्रम देखील साजरे करण्यात आले.

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील एन.सी.सी. कॅडेट्सची उल्लेखनीय कामगिरी :-**

१. प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे होणाऱ्या संचलनासाठी महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागामधील लिडिंग कॅडेट अमिषा केदारी हिची अनेक टप्प्यांमधून निवड होऊन ती दिल्ली येथे कर्तव्यपथ संचलनामध्ये सहभागी झाली.

२. ऑल इंडिया नौसैनिक स्पर्धेकरिता एकूण पाच कॅम्पमधून निवड होवून आपल्या महाविद्यालयातील कॅडेट कॅप्टन ओमकार घाग, पीओ कॅडेट विराज सुर्वे, लिडिंग कॅडेट मयुरेश विपते व लिडिंग कॅडेट गौरी भागवत या चार जणांची महाराष्ट्राच्या ३६ जणांच्या टीममध्ये निवड झाली व त्यांनी या स्पर्धेत विशाखापट्टनम येथे सहभाग घेतला. या स्पर्धेत कॅडेट कॅप्टन ओमकार घाग याला बोट पुलिंग प्रकारामध्ये आणि पीओ कॅडेट विराट सुर्वे याला सिमन शिप प्रकारामध्ये कांस्य पदक प्राप्त झाले.

३. रत्नागिरी ते दाभोळ आणि परत अशा समुद्रमार्गे होणाऱ्या सेल बोट एक्स्पिडिशनमध्ये आपल्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थी आणि चार विद्यार्थिनींची निवड झाली.

४. भारतीय सैन्याच्या महार रेजिमेंट पुणे व मेकॅनाइड इंफट्री अहमदनगर तर्फे घेतल्या जाणाऱ्या आर्मी अटॅचमेंट कॅम्पमध्ये आपल्या महाविद्यालयातील पाच विद्यार्थी सहभागी झाले.

५. याचप्रमाणे मुंबई येथील सी ट्रेनिंग कॅम्प, केरळ येथील ट्रेकिंग कॅम्प, औरंगाबाद येथील एक भारत श्रेष्ठ भारत कॅम्प, तसेच इंडियन नेवल अकॅडमी, केरळ, एनडीए खडकवासला, पुणे आणि वॉटरमनशिप ट्रेनिंग सेंटर, गोवा येथील याचिंग कॅम्प्स, औरंगाबाद येथील बेसिक लीडरशीप व गुजरात येथील ॲडव्हान्स लीडरशीप कॅम्प, थलसैनिक कॅम्प यासारख्या राष्ट्रीय स्तरावरील व विविध ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प यामध्येही आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले व त्याठिकाणी विविध पारितोषिके प्राप्त केली.

| | |
|---|---|
| **प्रा. सानिका भालेकर** | **प्रा. उदय भाटे** |
| केअर टेकर | सब लेफ्टनंट |